टोमी द पाओला

# जादूगार आजी सुट्टीवर जाते



अनुवाद: सुजाता गोडबोले

**टोमी द पाओला**

# जादूगार आजी सुट्टीवर जाते

अनुवाद: सुजाता गोडबोले



अखेर मारिओ ला एकट्यालाच अर्पण!



एकदा जादूगार आजीला एक स्वप्न पडलं. त्यात ती एक लहान मुलगी होती आणि काँचेटा आजीच्या समुद्रकिनाऱ्यावरच्या घरात रहात होती.



त्यांना किती मजा येत होती!









“ये नोनालिना, ये!” काँचेटा आजीने तिला हाक मारली, “ये नोनालिना.” ते ऐकून जादूगार आजीला जाग आली. ती तर डोंगरावरच्या तिच्या कलेब्रियातल्या छोट्याश्या घरीच होती.

दुसऱ्या दिवशी जादूगार आजी तिच्याकडे आलेल्या लोकांची डोकेदुखी, दातदुखी असे सगळे त्रास दूर करत होती, पण दिवसभर तिला आजीचा स्वप्नातला आवाज ऐकू येत होता.





गावातले काही लोक आपापसात म्हणू लागले,
“आजीने आता एक सुट्टी घ्यायला हवी असं दिसतंय.”



जादूगार आजीने खिडकीतून बाहेर पाहिले. कॉंचेटा आजीचा आवाज तिला ऐकू येत होता अशी तिची आता खात्रीच झाली.

असं कसं होईल? जादूगार आजी विचार करू लागली. कॉंचेटा आजी देवाकडे जाऊन आता बरीच वर्षे झाली आहेत. या स्वप्नाचा अर्थ काय असेल बरं?



“अँथनी, आजी कसल्यातरी विचारात हरवलेली दिसते आहे,” बांबोलोना म्हणाली.

“हो, मलाही तसंच वाटतंय, आज ती मेयर साहेबांच्या डोकेदुखीवर तर चुकीचाच उपचार करणार होती. आतापर्यंत असं कधीच झालं नव्हतं!” अँथनी म्हणाला.



याचे उत्तर जादूगार आजीला त्याच रात्री मिळाले. तिच्या स्वप्नात ती आपल्या डोंगरावरच्या घराबाहेर बसली होती. आणि काँचेटा आजी तिच्या समोर बसली होती.

“हे बघ नोना बाळा, इतकी वर्षं तू फार काम केलंस. आता थोडे दिवस तू सुट्टी घ्यायला हवी. बांबोलोना रोजचं काम पाहू शकेल आणि अँथनी घरातली बाकीची सगळी कामं करेल - बकऱ्यांना चारा देईल, दूध काढेल, घराची आणि बागेची साफसफाई करेल. समुद्र किनाऱ्यावरचं माझं लहानसं घर रिकामंच आहे आणि तुझीच वाट पहात आहे. आता लवकर ये नोना.”



आजीला आता जाग आली.

“हो. मी आता जाईन!” आजी म्हणाली आणि हसत हसत परत झोपी गेली.





दुसऱ्या दिवशी सकाळी आजीने अँथनी आणि बांबोलोनाला बोलावले.

“बसा मुलांनो. मला तुम्हाला काहीतरी सांगायचं आहे. मी थोडे दिवस सुट्टी घेणार आहे आणि काँचेटा आजीच्या समुद्र किनाऱ्यावरच्या घरी जाऊन राहणार आहे.” आजीने त्यांना सांगितले.

“ओह! तू कधी जाणार आहेस?” बांबोलोनाने विचारले.

“परवा दिवशी,” आजी म्हणाली.

“आणि परत कधी येशील?” अँथनीने विचारले.

“ते मी नंतर सांगेन,” आजी म्हणाली. “मी तुम्हाला निरोप पाठवेन.”

“सगळं काही ठीक होईल.” आजी म्हणाली. “बांबोलोना, काही काळजी करू नकोस. कुठला मंत्र म्हणायचं याची तुला जर शंका आली, तर मोठ्या पुस्तकात बघ. आणि जर काही फारच वेगळे असेल, तर डोंगरापलीकडे जा, आमेलिया तुला मदत करेल.” आणि निघताना आजीने बांबोलोनाला एक छोटीशी पपी दिली.



“आणि अँथनी, मला माहित आहे की तू आता शहाण्यासारखा वागशील, आणि नको ते उद्योग करणार नाहीस. रोजच्यासारखं सगळं काम नीट कर. बांबोलोनाने सांगितलं तर तिला मदत कर. आणि लक्षात ठेव...”

“पास्ताच्या हंडीला हात लावू नकोस!”

बांबोलोना आणि अँथनी एकदम एका सुरात म्हणाले.





अँथनीने गावात पास्ताचा पूर आणला होता ते आठवून सगळेच हसू लागले.

आजीने मग अँथनीलाही एक पपी दिली आणि ती निघाली



आणि मग आजी समुद्र किनाऱ्यावरच्या घरी पोचली.







आता उद्या मी बांबोलोना आणि अँथनीला काहीतरी भेटवस्तू पाठवेन. आजीने विचार केला.



ज्या दिवशी भेट पोचली तेव्हा अँथनी बकऱ्यांना चारा देत होता. पण बांबोलोनाला काही धीर धरवेना. तिने लगेच भेट उघडली. आजीने समुद्र किनाऱ्यावरची खास टॉफी अँथनीसाठी पाठवली होती आणि बांबोलोनासाठी टबमध्ये घालायचा खूप फेस येणारा साबण.

बांबोलोनाने विचार केला, "आपण तर टॉफीच घेऊया!" आणि तिने लगेच नावाच्या चिठ्ठ्या बदलून टाकल्या.





अँथनीने आपली भेटवस्तू उघडली. "बांबोलोना, हे काय आहे?"

"अरे, हे तू तुझ्या अंघोळीच्या पाण्यात टाक, त्याचा खूप फेस होईल, ते फार छान असतं," आपली टॉफी चघळत चघळत बांबोलोना म्हणाली.











“अरे बापरे! आता परत हे काय आणखी!” मेयर ओरडले!

“निदान हा पास्ता तरी नाही आहे!” फेसावर तरंगणारा अँथनी म्हणाला!

समुद्र किनाऱ्यावर एक कबुतर आजीसाठी एक निरोप घेऊन आले.

“बांबोलोना, आता काय झालं?” आजी मनाशी म्हणाली.



मेयर म्हणाले, “जादूगार आजी, फार काही बिघडलं नाही. निदान सगळं गाव अगदी साफ, चकचकीत झालं!”





आजी म्हणाली, “फक्त चुकीची वस्तू चुकीच्या माणसाला मिळाली! बांबोलोना, आता तरी तू यातून काही शिकशील का?”

“माझी चूक झाली, आजी. मला माफ कर.” बांबोलोना म्हणाली.

“माझी पण चूक झाली!” अँथनी म्हणाला.

“पण आजी, याचा अर्थ इतकाच की आता तुला कधीच सुट्टी घेता येणार नाही!” मेयर म्हणाले.



“हो ना!” आजी म्हणाली. “पण आता जेव्हा मी सुट्‌टी घेईन ना, तेव्हा बांबोलोना आणि अँथनी दोघांनाही बरोबर घेऊनच जाईन!”